


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २०७, रविवार २८ एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# विखेंकडून ५० लाख रूपयांची ऑफर!

## ■ अपक्ष उमेदवार गिरीश जाधव यांचा खळबळजनक आरोप
## ■ विखे यांच्या हरकतींविरोधात न्यायालयात दाद मागणार

**नगर : प्रतिनिधी**

**भाजपाचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्या विरोधात हरकत घेऊ नये म्हणून विखे यांच्या समर्थकांनी ५० लाख रूपयांची ऑफर दिली होती असा खळबळजनक आरोप अपक्ष उमेदवार गिरीश जाधव यांनी केला आहे. आम्ही अनिलभैय्या राठोड यांचे मावळे आहोत. ५० लाखाच्या ऑफरला आम्ही भिक घालणार नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी विखे यांच्या अर्जावर घेतलेल्या हरकती फेटाळल्या असल्या तरी त्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात दाद मागण्यात येणार असल्याचे जाधव यांनी सांगितले.**

डॉ. सुजय विखे यांनी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जावर अपक्ष उमेदवार गिरीश जाधव यांनी शुक्रवारी उमेदवारी अर्जांच्या छाननी प्रसंगी दोन हरकती नोंदविल्या होत्या. या हरकतींवर बराच खल होऊन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी नऊ तासानंतर विखे यांचा अर्ज वैध ठरविला. त्यानंतर गिरीश जाधव यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

जाधव म्हणाले, विखे यांनी शासनाची वन विभागाची ५०० एकर जमीन १ रूपया देऊन आपल्या संस्थेसाठी घेतली. त्यांच्याकडे शासनाची ८०० ते ८५० एकर जमीन असून या जमिनीवर खाजगी कॉलेज उभारून लोकांकडून करोडो रूपयांच्या देणग्या घेत आहेत. त्यावर मी हरकत घेतली होती.

महानगरपालिकेची तीन कोटी रूपयांची पाणी पट्टी सर्वसाधारण सभेत भाजपाचे महापौर असताना ही पाणी पट्टी माफ करून घेण्यात आली. सुचक, अनुमोदक तसेच महापौर हे भाजपाचे यांनी सर्वांनी मिळून महापालिकेची लुट केली आहे. त्यासंदर्भात मी जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागण्यासाठी गेलो होतो असे जाधव म्हणाले.

जिल्हाधिकारी यांनी मी घेतलेल्या दोन्ही हरकती फेटाळून लावल्या. त्या कोणत्या मुद्दावर फेटाळल्या याचे स्पष्टीकरण देण्यात आले नाही. सहकारी संस्थांचा संबंध नसतो असे जिल्हाधिकारी सांगतात. सहकारी संस्थांचे तुम्ही थकबाकीदार असले तरीही अर्ज बाद होतो. विखे यांनी सरकारी जागेवर दिडशे कोटींचे कर्ज घेतले आहे. महापालिकेची तीन कोटी रूपयांची माफी घेतली यावर कोणी काही बोलायचेच नाही का ? असा सवाल जाधव यांनी केला.



### त्यांच्यासोबत फिरणारे विरोधात मतदान करणार

**पालकमंत्री राधाकृष्ण विखे आहेत म्हणून आमच्या विरोधात जिल्हाधिकाऱ्यांनी निकाल दिला. हा निकाल सर्वकालीन नाही. उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयात जाऊन या निकालास आव्हान देणार आहोत. आम्ही अनिल राठोड यांचे कार्यकर्ते आहोत. त्यांच्यासोबत आज जे लोक फिरत आहेत ते देखील विखे यांच्या विरोधात मतदान करणार असल्याचा दावा जाधव यांनी केला.**

### विखे यांना माफ करणार नाही

**डॉ. विखे यांनी मागील लोकसभा निवडणूकीत शिवसेना नेते अनिलभैय्या राठोड यांच्याशी गद्दारी केली. पायाला लागलेले असतानाही अनिलभैय्या राठोड यांनी विखे यांचा प्रचार केला होता. रक्तातील साखर वारंवार वाढत असताना, पायाला लागलेले असताना रूग्णालयात उपचार घेऊन वीस-बावीस दिवस रोज प्रचार केला. त्याची विखे यांना लाज नाही. आणि आज ते म्हणतात की शिवसेनेचे लोक विरोधात आहेत. विरोधात काय सांगता तुमच्यामुळेच अनिल राठोड हे गेले. त्यामुळे विखे यांना आम्ही कधीही माफ करणार नाही असे जाधव म्हणाले.**

# ४ जूनला विकसित भारताची पायाभरणी होणार

## खा.डॉ. सुजय विखे यांचा विश्वास



**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**४ जून रोजी विकसित भारताची पायाभरणी होणार असून ४०० पारच्या माध्यमातून नवा इतिहास लिहिला जाणार असा विश्वास महायुतीचे उमेदवार खा.डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.घोगरगाव व देऊळगाव येथील प्रचार सभेत ते बोलत होते.**

महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांचा दुसऱ्या टप्प्यातील प्रचार चांगलाच गाजत आहे. ठिकठिकाणी त्यांना लोकांचा प्रतिसाद मिळत आहे. गावोगाव पिंजून काढत असताना त्यांनी लोकांच्या समस्या जाणून घेण्याचे काम सुरू आहे. मागील पाच वर्षात त्यांनी केलेली विकास कामे त्याच बरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दशकात झालेली कामे हा त्यांचा प्रचाराचा अजेंडा आहे. विकास कामांच्या जोरावर ते मतदारांना आवाहन करत आहेत.

शनिवारी श्रीगोंदा तालुक्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी घोगरगाव येथे सभा घेत रुईखेल, बागर्डे, तरणगव्हाण, चवरसांगवी, बनप्रिंपी, थिडे सांगवी या गावातील नागरिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांच्या सोबत युवा नेते विक्रमसिंह पाचपुते, जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब महाडिक, तालुका अध्यक्ष संदीप नागवडे, अर्जून शेळके, सिद्धेश्वर देशमुख, बक्षुद्दीन शेख, राजेंद्र बेरड, घोगरगावचे सरपंच सुजाता भोसले, सुवर्णाताई भोसले, सचिन जगताप तसेच गावातील आजी माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, आणि इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना सुजय विखे पाटील यांनी सांगितले की, उर्वरीत पान ३ वर

# दलाल राहुल शिंदे यांचे संतुलन बिघडले!

## ■ सुवर्णा धाडगे यांची बोचरी टीका ■ एखाद्या निवडणूकीत गुलाल घेतला का?

**पारनेर : प्रतिनिधी**



**पारनेर तालुक्यातून नीलेश लंके यांना मोठया प्रमाणावर पाठबळ असून इतर विधानसभा मतदारसंघातही लंके यांचाच बोलबाला आहे. संपूर्ण लोकसभा मतदारसंघात भाजपाचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांना जनतेचा प्रतिसाद मिळत नसल्याने हतबल झालेले भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे. एकाही निवडणूकीत गुलाल न घेतलेले राहुल शिंदे हे मतदारसंघातील नागरीकांची दिशाभूल करीत असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा सुवर्णा धाडगे यांनी सांगितले.**

धाडगे यांनी सांगितले की, ज्या राहुल शिंदे यांना नीलेश लंके यांनी चार वेळा पराभूत केले ते लंके यांच्यावर पारनेर तालुका नाराज असल्याचे सांगत आहेत हाच विनोद आहे. पारनेर तालुक्याच्या कोणत्याही प्रश्नांची सोडवणूक लंके यांनी केली नसल्याचे सांगणार्या शिंदे यांना गेल्या साडेचार वर्षात त्यांनी मतदारसंघात आणलेला १ हजार ४०० कोटी रूपयांचा निधी दिसत नाही. दहशत नेमके कोण निर्माण करीत आहे ? असा सवाल करून धाडगे म्हणाल्या, नीलेश लंके यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये त्यांच्यावर केवळ कांदा भावाच्या आंदोलनाचा एकच गुन्हा दाखल आहे. केवळ स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी शिंदे हे बेछूट आरोप करीत आहेत.

नीलेश लंके यांनी प्रशासनास वेठीस धरल्याचा आरोप उर्वरीत पान ३ वर

# शरद पवार यांची शेवगावात सभा

## बाळासाहेब थोरात यांची उपस्थिती



**शेवगाव : प्रतिनिधी**

**नगर दक्षिण लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ आठ दिवसात तिसऱ्यांना या मतदारसंघात हजेरी लावणार आहेत. शेवगाव शहरातील खंडोबानगर येथे रविवारी दुपारी ३ वाजता प्रचारसभेचे आयोजन करण्यात आले असून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते,माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असणार असल्याची माहिती राष्ट्रवादी पक्ष शरदचंद्र पवार गटाचे प्रदेश सचिव ॲड. प्रतापकाका ढाकणे यांनी दिली.**

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी गेल्या दोन अडीच वर्षांपासून दक्षिण लोकसभा मतदारसंघात संपर्क सुरू केला होता. दिवाळी दरम्यान हंगा येथे झालेल्या दिवाळी फराळाच्या कार्यक्रमासाठी त्यांनी नगर दक्षिण मतदार संघातील कार्यकर्त्यांना आमंत्रित केले होते.यावेळीच आ.लंके हे लोकसभेचे उमेदवार असणार असे अडाखे बांधण्यात येत होते. दरम्यानच्या काळात त्यांच्या पत्नी जि.प. सदस्या राणीताई लंके यांनी शिवसंवाद यात्रेच्या माध्यमातून दक्षिण मतदार संघातील गावांना भेटी देत कार्यकर्त्यांची संवाद साधला.या शिवसंवाद यात्रेलाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यानंतर हा लंके यांनी नगर शहरात शिवपुत्र संभाजी या महानाट्याचे आयोजन केले होते. या महानाट्याला नगरकरांसह नगर दक्षिण मतदार संघातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदलत्या राजकीय घडामोडी सुरू असतानाच अजित पवार गटात असलेले आमदार लंके यांनी पुण्यात शरद पवार यांच्या हस्ते मी अनुभवलेला कोव्हिड या पुस्तकाचे प्रकाशन केले. त्याचवेळी ते शरद पवार गटात प्रवेश करणार अशी राजकीय वर्तुळात चर्चा होती परंतु त्यावेळी प्रवेश न करता लंके यांनी राजकीय संभ्रमावस्था कायम ठेवली.यानंतर झालेल्या राजकीय घडामोडीत शरद पवारांसह बाळासाहेब थोरात, उद्धव ठाकरे या आघाडीच्या नेत्यांकडून लंके यांना उर्वरीत पान ३ वर




# हिवरे बाजारसारखे नेतृत्व देशातील गावांना लाभले तर ग्रामविकास गतिमान होईल

## सहसचिव रवि कुमार अरोरा यांचे मत



**हिवरे बाजार : प्रतिनिधी**

**हिवरे बाजारसारखे सामुहिक नेतृत्व देशातील इतर गावांना लाभले तर ग्रामविकास गतीमान होईल असे मत केंद्र सरकारच्या नगरविकास विभागाचे सहसचिव रवि कुमार अरोरा यांनी व्यक्त केले.**

सहसचिव अरोरा यांनी हिवरे बाजारला भेट देवून विकासकामांची पहाणी केली. पद्मश्री पोपटराव पवार यांनी त्यांचे स्वागत करून हिवरेबाजारची यशोगाथा कथन केली.

श्री. अरोरा म्हणाले की,केंद्र सरकारचा निवडणूक निरीक्षक म्हणून नगर जिल्ह्यात फिरत असताना आदर्श गाव हिवरे बाजारला भेट देण्याचा योग आला. पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे संरक्षण आणि योग्य नियोजन करून दुष्काळ कसा हरवावा याचा आदर्श मला हिवरे बाजारला पहावयास मिळाला.त्याचबरोबर विकासाला दिलेली अध्यात्माची जोड हा विशेष अनुभव मला मिळाला.पद्मश्री पोपटराव पवार यांच्या त्यागी आणि समर्पित ,वाचनबद्ध वृत्तीतून हिवरे बाजार स्वत:च्या पायावर उभे राहिले.पोपटराव पवार यांचे नेतृत्वातून गावाचा कायाकल्प करणे.हा देशातला एक नवा आदर्श आहे.त्याबद्दल सर्व गावकऱ्यांना मी धन्यवाद देतो. उर्वरीत पान ३ वर

Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's
**Saint Vivekanand Public School**
A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar
PH-9860815843, 9420812001

**REQUIRED TEACHERS 2024-2025**

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
| --- | --- | --- | --- |
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024
10.00 AM to 3.PM at Above Address

Note -
- Salary commensurate based on skill, qualification and Experience.
- Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education



फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी



# कडक उन्हाळ्यात थंडावा देणारे फेसपॅक

**सौंदर्य उत्पादनांमध्ये असलेली रसायने कधीकधी आपल्या त्वचेला हानी पोहोचवतात. उन्हाळ्यात अनेकांना कोरड्या त्वचेच्या समस्येला सामोरे जावे लागते. जेव्हा त्वचा कोरडी होते तेव्हा त्वचेवर खाज सुटणे आणि जळजळ होऊ लागते. उन्हाळ्यात त्वचा कोरडी पडली की मुरुम येण्याची शक्यताही वाढते. उन्हाचा थेट परिणाम आपल्या त्वचेवर होत असतो. अशा उन्हात महिला चेहरा आणि त्वचेचे संरक्षण करण्यासाठी विविध मार्ग शोधू लागतात. चेहरा चमकदार आणि सुंदर बनवण्यासोबतच तो थंड ठेवणंही खूप गरजेचं आहे. घरातील काही गोष्टींचा वापर करून तुम्ही चमकदार त्वचा मिळवू शकता. या पदार्थांचा वापर करून तुम्ही त्वचा थंड ठेवू शकता. हे फेसपॅक तुमचा चेहरा क्षणार्धात चमकवू शकतात. यातून त्वचेचा पोत सुधारण्यास मदत होते. बदलत्या हवामानामुळे त्वचेत अनेक बदल दिसू लागतात.**

- बटाट्याचा फेस पॅक : उन्हाळ्यात चेहरा थंड ठेवण्यासाठी आणि डाग दूर करण्यासाठी आणि चेहरा चमकदार करण्यासाठी बटाटा एक प्रभावी उपाय आहे. यासाठी बटाट्याच्या रसात कच्चे दूध घालून चांगले मिसळा. आता हे मिश्रण चेहरा आणि मानेवर लावा आणि १५ मिनिटांनी चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा. हा फेस पॅक तुम्ही आठवड्यातून तीन वेळा वापरू शकता.
- पपई आणि केळी फेस पॅक : पपई आणि केळी मॅश करा आणि मिक्स करा. आता त्यात थोडे मध टाका. पेस्ट बनवण्यासाठी सर्वकाही चांगले मिसळा. ते आपल्या चेहऱ्यावर लावा आणि ते कोरडे होईपर्यंत थांबा. नंतर पाण्याने धुवा. या फेसपॅकमुळे त्वचेचा पोत सुधरण्यास मदत होते.
- काकडी आणि कोरफडीचा फेस पॅक : काकडीत असलेले व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए आणि अँटी-ऑक्सिडंट एजंट्स चेहऱ्यावरील मृत त्वचेच्या पेशी काढून टाकून ते ताजे आणि चमकदार बनवण्यास मदत करतात. त्याच वेळी ॲलोव्हेरामध्ये अँटी-एजिंग आणि अँटी-बॅक्टेरियल घटक असतात आणि डाग आणि सुरकुत्या कमी करून चेहऱ्याला मॉइश्चरायझेशन ठेवण्याचे काम करतात. हा फेसपॅक तुम्ही आठवड्यातून दोन वेळी ट्राय करू शकता. हा फेस पॅक बनवण्यासाठी १ चमचा एलोवेरा जेल १ किसलेल्या काकडीत मिसळा आणि ही पेस्ट चेहऱ्यावर लावा. त्यानंतर २० मिनिटांनी चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा.
- चंदन आणि रोझ वॉटर फेस पॅक : उन्हाळ्यात चेहरा थंड ठेवण्यासाठी चंदन हा चांगला पर्याय आहे. गुलाब पाण्यात चंदन मिसळून लावल्याने चेहरा चमकू लागतो आणि चेहरा निरोगी दिसू लागतो. चंदनाचा फेस पॅक बनवण्यासाठी १ चमचा चंदन पावडरमध्ये १ चमचा गुलाब टाकून पेस्ट बनवा. हा फेस पॅक चेहऱ्यावर लावा आणि १५ मिनिटे सुकल्यानंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा.
- टरबूज फेस पॅक : टरबूज हा पाण्याचा चांगला स्त्रोत मानला जातो. जे त्वचेचे अतिरिक्त तेल शोषून छिद्रांना घट्ट ठेवण्यास मदत करते. यासाठी तुम्ही टरबूजाचा तुकडा मॅश करून थेट चेहऱ्यावर लावा आणि २० मिनिटांनंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा. उन्हाळ्यात टरबूज मोठ्या प्रमाणात मिळतात. त्यामुळे या उपायाने तुमची त्वचा चांगली होण्यास मदत होईल.



# झोपण्यापूर्वी तेलकट त्वचेची अशी घ्या काळजी...

**ज्या तरुणी आपल्या त्वचेची चांगल्या पद्धतीनं देखभाल करतात, त्यांची त्वचा नेहमी निरोगी आणि नितळ राहते. विशेषतः ज्या महिलांची त्वचा तेलकट असते, त्यांनी त्वचेची दुप्पट काळजी घेणे आवश्यक आहे. त्वचेची देखभाल केवळ सकाळीच नाही तर रात्री झोपण्यापूर्वीही करणं आवश्यक आहे. काही गोष्टी नियमानं केल्यास तुम्हाला महागड्या ब्युटी प्रोडक्टचा आधार घेण्याची गरज कधीच भासणार नाही. रात्रीच्या वेळेस आपल्या त्वचेच्या पेशी दुरुस्त होतात, यासाठीच देखभालीमध्ये कोणताही हलगर्जीपणा करू नये. कंटाळा न करता घरगुती उपचार केल्यास मुरुम, डाग, सुरकुत्या आदी समस्या उद्भवणार नाहीत. रात्री झोपण्यापूर्वी त्वचेची कशी देखभाल करावी, याच्या काही सोप्या टिप्स जाणून घेऊया...**

## स्टेप १ : मेकअप काढा

- ज्या महिलांच्या चेहऱ्यावर दिवसभर मेकअप असतो. त्यांनी झोपण्यापूर्वी मेकअप काढणं आवश्यक आहे. मेकअप रिमूव्हरच्या मदतीनं चेहरा स्वच्छ करून घ्या. चेहऱ्यावरील मेकअप स्वच्छ करण्यासाठी तुम्हाला बदामाचे तेल, नारळाचं तेल, बेबी ऑईल किंवा एखादं नैसर्गिक क्लीनरचा वापर करू शकता. रात्री मेकअप लावून झोपल्यास चेहऱ्यावर छिद्रे बंद होतात. यामुळे छिद्रांमधील दुर्गंध बाहेर येत नाही. परिणाम मुरुमांची समस्या उद्भवते.

## स्टेप २ : क्लींझिंगनं चेहरा स्वच्छ करा


- कोरड्या त्वचेच्या तुलनेत तेलकट त्वचेवर धूळ-मातीचे कण आणि तेल साचण्यास सुरुवात होते. यामुळे चेहऱ्याच्या त्वचेवरील छिद्रे बंद होतात. छिद्रे पूर्णतः बंद झाल्यास त्वचेच्या गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. यासाठी सकाळी आणि रात्री चेहरा क्लींझिंग मिल्क किंवा जेलनं स्वच्छ करावा. झोपण्यापूर्वी चेहरा स्वच्छ केल्यास सकाळी उठल्यानंतरही चेहरा प्रसन्न दिसेल. डॉक्टरांकडून एखादी नाइट क्रीम लावण्याचा सल्ला घ्यावा.

## स्टेप ३ : स्क्रब करा

- तेलकट त्वचेवर ब्लॅकहेडच्या समस्या जास्त असतात. या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी त्वचेवर हलक्या हातानं स्क्रब करून एक्सफोलिएट करावं. स्क्रबमुळे डाग कमी होतात आणि चेहऱ्यावर तेज येतो. हळद, बेसन, तांदळाचं पीठ आणि कच्चे दूध एकत्र करून घरगुती स्क्रब तयार करा. दोन चमचे बेसन, दोन चमचे तांदळाचं पीठ, अर्धा चमचा हळद आणि दूध एकत्र करून स्क्रब तयार करा. ही पेस्ट २० मिनिटांसाठी चेहऱ्यावर लावून ठेवा आणि त्यानंतर चेहरा स्वच्छ धुऊन घ्या.

## स्टेप ४ : स्किन टोनिंग

- स्क्रब केल्यानंतर चेहरा टोनिंग करण्याची प्रक्रिया अतिशय आवश्यक आहे. कारण याद्वारे उघडलेली छिद्रे बंद केली जातात. चांगल्या कंपनीच्या टोनरमुळे त्वचेवरील पोर्स बंद करण्यास मदत मिळेल. शिवाय, त्वचेच्या पेशी देखील दुरुस्त होतील. घरगुती टोनर म्हणून पुदिन्याच्या पानांचा वापर करू शकता. यामुळे त्वचेवरील मृत पेशी कमी होण्यास मदत मिळते. गरम पाण्यामध्ये पुदिन्याची पाने काही वेळासाठी ठेवा. थंड झाल्यानंतर या



पाण्यानं चेहरा स्वच्छ धुवून घ्या. काही वेळानंतर कोमट पाण्यानं चेहरा पुन्हा स्वच्छा धुवा.

## स्टेप ५ : सीरम लावायला विसरू नका

- त्वचेमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आणि सुरकुत्यांची समस्या कमी करण्यासाठी त्वचेवर सीरम लावणे गरजेचे आहे. तुम्हाला हवे असल्यास अँटी एजिंग सीरमचाही वापर करू शकता. त्वचा तेलकट असल्यास तुम्ही सॅलिसिलिक ॲसिड आणि रेटिनॉल फेस सीरम लावा. घरगुती सीरम म्हणून तुम्ही कोरफडीचा रस काढून एका बाटलीमध्ये साठवून ठेवा आणि आवश्यकतेनुसार वापरा. पण ताज्या रसाचा वापर नेहमी करावा.

## स्टेप ६ : सर्वात शेवटी लावा क्रीम

- डोळ्यांखालील वर्तुळे सुरकुत्या आणि डाग या समस्या कमी करण्यासाठी नाइट क्रीम लावा. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नाइट क्रीम काही मिनिटांसाठी लावायची आहे की रात्रभर लावून झोपायचं आहे, याबाबत योग्य तो सल्ला घ्यावा.

# उन्हाळ्यात स्टायलिश दिसण्यासाठी...

**ऋतूनुसार फॅशनही बदलत राहते. आता उन्हाळा आला आहे. त्यामुळे उन्हाळ्यानुसार फॅशनही बदलू लागली आहे. अशात जर तुम्हाला आरामदायक पण फॅशन स्टाइल फॉलो करायच्या असतील, तर आम्ही तुमच्यासाठी काही फॅशन टिप्स घेऊन आलो आहोत. उन्हाळ्यात या फॅशन टिप्स नक्की फॉलो करा...**



जसजसा उन्हाळा वाढत जातो तसतसे आपण आपल्या वॉर्डरोबमध्ये आरामदायक कपडे शोधू लागतो. या काळात महिला कॉटनपेक्षा लिनन फॅब्रिकचे कपडे घालण्यास प्राधान्य देत आहेत. कापूस आणि लिनेनमध्ये फारसा फरक नाही. पण तुलनेत, तागाचे कापड अधिक हवेशीर आणि हलके फॅब्रिक आहे. उन्हाळ्यात तुम्ही कूल आणि स्टायलिश दिसण्यासाठी काही गोष्टी फॉलो करू शकता. उन्हाळ्यात उन्हाचा खूप त्रास होतो. त्यामुळे ही दहकता कमी करण्यासाठी तुम्ही पांढऱ्या रंगाचे कपडे तुमच्या वॉर्डरोबमध्ये ठेवा. उन्हाळ्यात पांढऱ्या रंगाचा शॉर्ट ड्रेस, मॅक्सी ड्रेस, लखनवी सूट, अनारकली, साडी, शर्ट, पेन्सिल स्कर्ट, ट्राउझर्स इत्यादी ट्राय करता येतात. तुम्ही ब्लॅक अँड व्हाईट कलर देखील ट्राय करू शकता. त्याप्रमाणे हातमागावर तयार केलेल्या साड्यादेखील तुम्ही नेसू शकता. या उन्हाळ्यात पांढऱ्या रंगासोबत गुलाबी, पिवळा, केशरी, लॅव्हेंडर, ऑलिव्ह ग्रीन अशा पेस्टल रंगांचा देखील तुम्ही वापर करू शकता. या काळात जर तुम्हाला साडी नेसायची असेल तर हँडलूम साड्या तुमच्यासाठी उत्तम पर्याय ठरू शकतो.

- ब्लाऊजची कम्फर्टेबल फिटिंग : साडीवर ब्लाऊज चांगले असणे महत्त्वाचे आहे. आरामदायी कपडे उन्हाळ्यात चांगले दिसतात. त्यामुळे जास्त फिटिंगचे कपडे घालू नका. ब्लाऊजची कम्फर्टेबल फिटिंग त्याच प्रमाणे लिनन जॅकेट, टॉपसद्धा तुम्ही कॉटन साडीवर ट्राया करू शकता. यामुळे तुम्हाला ग्लॅमरस लुक मिळण्यास मदत होईल.
- पार्टीसाठी परफेक्ट लुक : या सीझनमध्ये पार्टी वेअरमध्येही सिल्व्हर कलरला खूप पसंती दिली जात आहे. उन्हाळ्यात तुम्ही सिल्व्हर कलरचा पार्टी वेअर ड्रेसही घालू शकता. याशिवाय तुम्ही पारंपारिक गाऊन किंवा ऑलिव्ह ग्रीन, पिंक, पीच यांसारख्या पेस्टल रंगांची साडी देखील घालू शकता.
- उन्हाळ्यात पांढऱ्या रंगाचा वापर करा : उन्हाळ्यात उन्हाचा खूप त्रास होतो त्यामुळे ही दहकता कमी करण्यासाठी तुम्ही पांढऱ्या रंगाचे कपडे तुमच्या वॉर्डरोबमध्ये ठेवा. उन्हाळ्यात पांढऱ्या रंगाचा शॉर्ट ड्रेस, मॅक्सी ड्रेस, लखनवी सूट, अनारकली, साडी, शर्ट, पेन्सिल स्कर्ट, ट्राउझर्स इत्यादी ट्राय करता येतात. त्याप्रमाणे हातमागावर तयार केलेल्या साड्या देखील तुम्ही नेसू शकता. या उन्हाळ्यात पांढऱ्या रंगासोबत गुलाबी, पिवळा, केशरी, लॅव्हेंडर, ऑलिव्ह ग्रीन अशा पेस्टल रंगांचा देखील तुम्ही वापर करू शकता.



### लिनेनची काळजी

तुम्ही पारदर्शक कपडे देखील वापरू शकता. पण तुमच्या शरीरयष्टीवरून कपडे निवडण्याचा प्रयत्न करा. लिनेन हे आरामदायी फॅशनचे प्रतीक आहे. अशा परिस्थितीत तिच्या ड्रेस, शर्ट किंवा पॅन्टवर जरी सुरकुत्या दिसल्या तरी त्या लपवायची गरज नाही. सुरकुत्या असतानाही तुम्ही ते आत्मविश्वासाने कॅरी करू शकता. खरेतर, आता वापरले जाणारे तागाचे कपडे पारंपारिक बॉक्सी लिनेनपेक्षा मऊ आहेत ज्यांना स्टार्च किंवा कडक दाबाची आवश्यकता नाही. अशा परिस्थितीत, तुम्ही ते धुवून आणि स्टीम प्रेसने दाबून कोणत्याही त्रासाशिवाय परिधान करू शकता.

# मिठाने मिळवा मऊ मुलायम केस अन् नितळ त्वचा



**मीठ हा आपल्या अन्नाचा सर्वात आवश्यक आणि महत्त्वाचा भाग आहे. त्याशिवाय अन्न चवीचं लागत नाही. पण तुम्हाला माहीत आहे का, की या मीठाचा वापर चेहरा आणि केसांचे सौंदर्य वाढवण्यासाठी देखील केला जातो. मिठाने त्वचेच्या अनेक समस्या दूर केल्या जाऊ शकतात. यात कॅल्शियम, सिलिकॉन, सोडियम इत्यादी अनेक प्रकारची खनिजे असतात जी त्वचा गुळगुळीत आणि तरुण बनवण्यास मदत करतात. विशेषतः मिठाच्या पाण्याने चेहरा धुतल्यास अनेक समस्या कमी होतात. मिठाच्या पाण्यात असलेले गुणधर्म त्वचेला एक्सफोलिएट करतात. त्यामुळे मिठाच्या वापराने तुम्ही मऊ मुलायम केस मिळवू शकता. चला तर मग जाणून घेऊयात तुम्ही मिठाचा वापर तुम्ही कशा प्रकारे करू शकता...**

- टोनर म्हणून वापरा : तुम्ही मिठाचे पाणी टोनर म्हणून वापरू शकता. मीठ पाणी मृत पेशी काढून टाकण्यास मदत करते. त्यामुळे त्वचा गुळगुळीत आणि मुलायम होते. एवढेच नाही तर टोनर म्हणून वापरल्यास चेहऱ्यावर चमक येईल. टोनर बनवण्यासाठी, एका लहान स्प्रे बाटलीमध्ये पाणी आणि एक चमचे मीठ घाला आणि रोज वापरा. हे पाणी फक्त एक आठवडा बनवा आणि नंतर ते पुन्हा वापरण्यासाठी नवीन मीठ आणि पाणी मिसळून टोनर बनवा. जर तुम्हाला थकवा आला असेल तर यावेळी तुम्ही मिठाच्या गरम पाण्यात पाय टाकू शकता.
- मुरुमांपासून सुटका : जर तुम्हाला मुरुमांचा त्रास होत असेल तर मिठाच्या पाण्याचा वापर करा. मिठाच्या पाण्यात असलेले बरे करण्याचे गुणधर्म त्वचेच्या समस्या कमी करण्यास मदत करतात. जर तुम्हाला मुरुमांचा त्रास होत असेल तर एक कप पाण्यात एक चमचा मीठ मिसळा. हे मिश्रण कापसाच्या मदतीने प्रभावित भागावर लावा. कोरडे होऊ द्या यानंतर चेहरा पाण्याने धुवा. यावेळी शक्यतो समुद्री मीठचा वापर करा.
- त्वचेची ॲलर्जी दूर करते : सोरायसिस, एक्जिमा, कोरडी त्वचा इत्यादी त्वचेच्या अनेक समस्या दूर करण्यासाठी मीठ पाण्याचा वापर केला जातो. वास्तविक, समुद्री मीठामध्ये कॅल्शियम, पोटॅशियम आणि मॅग्नेशियमसारखे अनेक प्रकारचे पोषक घटक आढळतात, जे तुमची त्वचा निरोगी ठेवण्यासाठी प्रभावी आहेत.
- तेलकट केसांसाठी फायदेशीर : अनेकांची टाळू खूप तेलकट असते. त्यामुळे केस धुवल्यानंतर दुसऱ्या दिवशी केस चिकट होतात. अशा स्थितीत आंघोळ करताना मिठाच्या पाण्याने केस धुवावेत. यामुळे तुमचे केस कमी तेलकट होतील आणि त्यात चमकही येईल.



- मृत त्वचेपासून सुटका : मीठामध्ये नैसर्गिक एक्सफोलिएंट गुणधर्म असतात, जे तुमच्या त्वचेतील मृत पेशी काढून टाकण्यास प्रभावी असतात. जर तुम्हाला तुमच्या त्वचेचा टवटवीतपणा आणायचा असेल तर मिठाच्या पाण्याने चेहरा धुवा. यामुळे त्वचेची चमक वाढण्यास मदत होईल.
- स्क्रब म्हणून काम करा : तुम्ही मिठाचे पाणी स्क्रब म्हणून देखील वापरू शकता. हे त्वचेतील मृत पेशी काढून टाकून तुमची त्वचा आतून स्वच्छ ठेवते. एवढेच नाही तर ब्लॅकहेड्स आणि व्हाईटहेड्सची समस्या दूर करण्यातही हे गुणकारी आहे. त्यामुळे महागड्या क्रीम खरेदी करण्यापेक्षा घरात असणाऱ्या मीठाचा वापर करून तुम्ही नितळ त्वचा मिळवू शकता.

## शॉर्ट न्यूज

### जवळा मुक्कामी बस बंद केल्याने प्रवाशांची गैरसोय

■ **पारनेर :** अनेक वर्षांपासून कान्हूर पठार मार्गे नगरहून जवळा (ता. पारनेर) येथे मुक्कामी जाणारी एसटी बस पारनेर आगाराने अचानक बंद केली. त्यामुळे विद्यार्थ्यांबरोबर प्रवाशांचे हाल होत आहेत. जवळा (ता. पारनेर) येथून ही बस सकाळी सुटते. पाडळी दर्या मार्गे कान्हर पठार गोरेगाव, पाडळी फाटा, हिवरे कोरडा, माळकूप, भाळवणी मार्गे नगरला जाते. यात बहुतांशी नगरला जाणारे विद्यार्थीच असतात. अनेक वर्षांपासून या मार्गावरील प्रवाशांची या बसमुळे सकाळी लवकर नगरला जाण्यासाठी मोठी सोय होते होती.

### टाकळीभानमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ सुरूच

■ **श्रीरामपूर :** तालुक्यातील टाकळीभान येथे भुरट्या चोऱ्यांचे सत्र सुरूच आहे. रात्री अज्ञात चोरट्यांनी येथील स्वामी समर्थ अलंकार गृह या दुकानाचा मागील बाजूचा छताचा पत्रा उचकटून २५ ते ३० हजार रुपये किंमतीचे बेन्टेक्सचे दागिने चोरून नेले आहे. दुकानात चोरी झाल्याचा प्रकार आज सकाळी उघडकीस आला आहे. याबाबत दुकानाचे मालक अजय बिरारी यांनी दुकानात झालेल्या चोरी बाबत माहिती श्रीरामपूर तालूका पोलिस स्टेशनला दिली आहे.

### डॉ. संजय दवंगे यांची नियुक्ती

■ **कोपरगांव :** तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित के. जे. सोमैया (वरिष्ठ) व के. बी. रोहमारे (कनिष्ठ) महाविद्यालय कोपरगांव येथील हिंदी विभागप्रमुख डॉ. संजय दवंगे यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथील एम. ए. हिंदी शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमाच्या स्वयं अध्ययन साहित्य लेखन कार्यासाठी निवड झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. यादव यांनी दिली आहे. या निवडीचे पत्र नुकतेच त्यांना प्राप्त झाले आहे.

### अवैध दारू वाहतूक करणारा तरुण गजाआड

■ **राहुरी :** येथील पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना गुप्त बातमी दारामार्फत अवैध दारू वाहतूक होत असल्याची बातमी मिळाली. त्यानुसार राहुरी पोलिस पथकाने राहुरी शहरात सापळा लावला. तेव्हा पोलिस पथकाला एक टाटा इंडिका वाहनांमध्ये सोहेल शब्बीर शेख हा तरुण दारूची चोरटी वाहतूक करताना मिळून आला. पथकाने आरोपी कडून १ लाख ४२ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी सोहेल शब्बीर शेख, रा. वनकुटे, ता. पारनेर. याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला गजाआड करण्यात आले. या घटनेचा पुढील तपास राहुरी पोलिस करत आहेत.

### शेवगाव एसटी आगाराला १७ लाखांचे उत्पन्न

■ **शेवगाव :** नुकत्याच पार पडलेल्या श्रीक्षेत्र पैठण येथील नाथ षष्ठी, मढीची फुलबाग यात्रा महोत्सवाच्या कालावधीत शेवगाव आगाराला १७ लाख ४१ हजार रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळाल्याची माहिती आगार व्यवस्थापक अमोल कोतकर यांनी दिली. उत्पन्नाच्या बाबतीत जिल्ह्यात उच्चांक असल्याचे ते म्हणाले वरील यात्रा महोत्सवाच्या कालावधीत शेवगाव आगाराने ५१ बस वापरल्या ५७४ फेऱ्या करून २७ हजार ५८८ किलोमीटर प्रवास केला. १७ हजार ४९० प्रवाशांच्या माध्यमातून आगाराला १७ लाख ४१ हजार रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळाले.

# शेवगावात डॉ. सुजय विखे यांच्या भेटीगाठी

## प्रचार दौऱ्यातून साधला लोकांशी संवाद



शेवगांव : प्रतिनिधी

**अहिल्यानगर दक्षिण मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आणि विद्यमान खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रचारात मोठी मुसंडी घेतली आहे. नियमित कार्यकर्ते, मतदारांच्या गाठी भेटी घेत असल्याने त्यांचे समर्थन वाढत आहे. याच धर्तीवर त्यांनी शुक्रवारी शेवगांव शहरात आपल्या प्रचार सभा घेतल्या असता शेवगांवातही त्यांचा डंका दिसून आला. यावेळी त्यांच्या सोबत आमदार मोनिकाताई राजळे, अरुण मुंडे यांच्यासह इतर प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.**

महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील हे शेवगांव शहरातील नागरिकांच्या गाठी भेटी घेत आहेत. त्यांनी फर्टीलायझर असोशियशन यांची बैठक घेतली. यावेळी त्यांनी फर्टीलायझर व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांशी संवाद साधत विविध प्रश्नांवर चर्चा केली. तसेच येणाऱ्या काळात महायुती सरकारच्या माध्यमातून त्यांचे प्रश्न सोडविले जातील असे त्यांनी सांगितले. त्याच बरोबर शेवगांव न्यायालय परिसर येथे वकील संघटनेशी बैठक घेत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या समस्या लवकरच मार्गी लावल्या जातील असे आश्वासन दिले.

सायंकाळी डॉ. सुजय विखे पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते क्रांती चौक – छ. शिवाजी महाराज चौक – श. भगतसिंग चौक पदयात्रा काढून मतदारांशी संवाद साधत देशाच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीला मतदान करा असे आवाहन त्यांनी केले. ठिकठिकाणी त्यांचे स्वागत आणि औक्षण करण्यात आले. यावेळी या पदयात्रेत मोठ्या संख्येने कार्यकर्ते, महिला, वृद्धांनी सहभाग घेतला होता.

यानंतर त्यांनी सोनमिया वस्ती येथे भोई समाज, बावडी गल्ली येथे चर्मकार समाज, तर जैन स्थानक येथे जैन समाजांच्या प्रतिनिधिंशी बैठका घेतल्या. यावेळी या समाजातील नागरिकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. तर बालाजी मंदिर मारवाडी गल्ली येथे व्यापारी आणि माहेश्वरी समाजीतील नागरिकांशी संवाद साधत त्यांनी आपल्या प्रचाराचा समारोप केला. सुजय विखे हे समाजातील सर्व घटकांशी संपर्क साधून त्यांच्याशी संवाद करत आहेत. देशाचे नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे सोपविण्याचे आवाहन करत आहेत. तसेच मागील १० वर्षाच मोदी सरकारच्या माध्यमातून झालेली कामे लोकांसमोर मांडत आहेत. तसेच येणाऱ्या काळात जिल्ह्याच्या विकासासाठी कोणती कामे केली जाणार यांची माहिती मतदारांना देत आहेत. विकासाच्या मुद्दावर चर्चा करत असल्याने मतदारांचा कौल त्यांच्या बाजूने दिसत आहे.

# काळ भैरवनाथांचा रविवारी आगडगावमध्ये यात्रोत्सव

## देवस्थानच्या वतीने भाविकांसाठी सुविधा

नगर : प्रतिनिधी



**आगडगाव (ता. नगर) येथील काळ भैरवनाथांची यात्रा रविवारी (ता. २८) भरणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या उत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले. सालाबादप्रमाणे यात्रोत्सवात कार्यक्रम होतील.**

रविवारी पहाटे महाआरती, सकाळी कावडीने आणलेल्या पाण्याने जलाभिषेक, दुपारी महाप्रसाद वाटप, संध्याकाळी काठ्यांची मिरवणूक व सांस्कृतिक कार्यक्रम होईल. कावडीनंतर होणाऱ्या महाआरतीला उद्योजक नरेंद्र फिरोदिया, तसेच मान्यवर उपस्थित राहतील. दुसऱ्या दिवशी (सोमवारी) कुस्त्यांचा हगामा भरणार आहे. राज्यातील मल्ल त्यामध्ये सहभागी होतील. हा हगामा जिल्ह्यात चर्चिला जातो. यात्रेकरू, भाविकांसाठी देवस्थानाच्या वतीने व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आगडगाव, टोकेवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

(पान १ वरून)

### ४ जूनला विकसित भारताची पायाभरणी होणार

२०४७ रोजी विकसित भारताचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखविले आहेत. या स्वप्नाला सत्यात उतरविण्यासाठी ४ जून रोजी देशात पुन्हा भाजप आणि महायुतीचे सरकार येणार असून या स्वप्नाची पायाभरणी केली जाणार आहे. मागील १० वर्षातील मोदी सरकारने केलेल्या कामामुळे देशात पंतप्रधान नरेंद्र मोदींवर देशवासियांचा विश्वास वाढला आहे. यामुळे यंदाच्या लोकसभा निवडणुकीत ४०० पार चा आकडा सहज गाठता येणार आहे. जिल्ह्यातही लोक नरेंद्र मोदी यांना पुन्हा देशाचे पंतप्रधान म्हणुन पाहू इच्छित आहेत. यामुळे राज्यातही महायुतीचा ४५ हून अधिक जांगावर विजय निश्चित आहे. निवडणुक अंतिम टप्प्यात असून पंतप्रधान मोदी यांचे क्रेज वाढत आहेत. तुम्ही दिलेला प्रतिसाद ही माझ्या विजयाची ग्वाही देत असल्याचे त्यांनी सांगितले.श्रीगोंदा तालुक्यातील नागरिकांनी डॉ. सुजय विखे पाटील यांचे स्वागत करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा देशाचे पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीशी असल्याचे गावकऱ्यांनी सांगितले.

### शरद पवार यांची शेवगावात सभा

राजकीय पाठबळ मिळाल्यानंतर त्यांनी आमदारकीचा राजीनामा देत शरद पवार गटात जाण्याचा निर्णय घेतला. यानंतर पहिल्याच उमेदवारीच्या यादीत त्यांची नगर दक्षिण लोकसभा मतदार संघाची उमेदवारी घोषित करण्यात आली.

आमदार लंके यांच्या स्वाभिमान जनसंवाद यात्रेच्या समारोपाला नगरच्या गांधी मैदानात शरद पवार, आदित्य ठाकरे, बाळासाहेब थोरात यांनी हजेरी लावली या सभेलाही नगरकरांनी भरभरून प्रतिसाद दिला.यानंतर राहुरी येथे झालेल्या प्रचारसभेला मतदारांनी भर उन्हात मोठा प्रतिसाद दिला त्या पाठोपाठ रविवारी शरद पवार यांची सभा शेवगाव येथे होत आहे या सभेलाही मतदार मोठ्या प्रमाणात उपस्थित राहणार असल्याचा विश्वास ॲड. प्रतापकाका ढाकणे यांनी व्यक्त केला.या सभेसाठी मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

### दलाल राहुल शिंदे यांचे संतुलन बिघडले!

शिंदे यांनी केला आहे. प्रशासनास कोण वेळीस धरते हे पारनेर तालुक्यालाचा नव्हे तर संपूर्ण नगर जिल्हयास माहीती आहे. आजही पारनेर तालुक्यात लंके यांनी मंजुर करून आणलेल्या ३५० कोटींच्या कामांना विखे पिता पुत्रांनी स्थगिती देऊन सत्तेचा गैरवापर केला याचीही जनतेला जाणीव आहे.

जमीनीच्या खरेदी विक्रीमध्ये दलाली करणाऱ्या राहुल शिंदे यांनी अनेक महिलांची फसवणूक केली आहे. त्यांचे संपूर्ण आयुष्य एजंटगिरी करण्यात गेले असून त्यांनी आणखी कशात एजंटगिरी केली हे सांगण्यासाठी तोंड उघडायला लावू नका असा इशाराही धाडगे यांनी दिला आहे.
खा. डॉ. सुजय विखे यांच्या आजोबांनी तेलबिया प्रकल्प सुरू करून तरूणांना रोजगार देतो असे सांगितले होते. त्यासाठी रांजणगांव मशिद येथे शेतकऱ्यांकडून १०० एकर जमीन घेण्यात आली. आता नातू मते मागत असतानाही हा प्रकल्प का उभा राहू शकला नाही याचे उत्तरही शिंदे यांनी द्यावे असे आव्हान धाडगे यांनी दिले आहे.

### हिवरे बाजारसारखे नेतृत्व देशातील गावांना लाभले तर ग्रामविकास गतिमान होईल

हिवरे बाजार सारखे सामुहिक नेतृत्व देशातल्या प्रत्येक खेड्यात उभे राहिले तर ग्रामविकास अतिशय गतिमानतेने व नीतिमानतेने होईल.असा विश्वास मला वाटतो.बरेच दिवस हिवरे बाजारला भेट देण्याची इच्छा होती ती आज सफल झाली.हिवरे बाजारचा शाश्वत विकास पाहून एक वेगळा आनंद व समाधान झाल्याचेही श्री.अरोरा यांनी सांगितले.

# शिवसेना संपविण्याचा शरद पवारांचा प्रयत्न

## शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांची टीका

मुंबई : प्रतिनिधी

**'राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी नेहमीच बाळासाहेब ठाकरे यांच्यावर टीका केली. कायम शिवसेनेचा द्वेष केला. अशा पवारांच्या कच्छपी आज उद्धव ठाकरे लागले आहेत. शरद पवार शिवसेनेचा पराकोटीचा द्वेष करतात. शिवसेनेचे नुकसान करण्याची कोणतीच संधी पवारांनी सोडली नाही', अशी टीका राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी शुक्रवारी केली.**



'२०१७ मध्ये भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीचे राज्य येण्याची शक्यता असताना सेना सत्तेत असेल तर आम्ही भाजपबरोबर येणार नाही, असे पवारांनी स्पष्ट सांगितले होते', असा गौप्यस्फोटही यावेळी केसरकर यांनी केला.
'महाराष्ट्रातील जनतेने आणि विशेषतः शिवसैनिकांनी काही महत्त्वाच्या गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत', असे ते म्हणाले. '१९८९च्या दरम्यान दिना बामा पाटील यांच्या मुलुंड येथील प्रचारसभेत पवारांनी बाळासाहेबांवर व्यक्तिगत टीका केली होती. त्याच मैदानात बाळासाहेबांनी सात दिवसांत सभा लावून पवारांना सडेतोड उत्तर दिले होते. त्यानंतर मनोहर जोशी यांनी मध्यस्थी केली व या दोन्ही नेत्यांनी एकमेकांच्या विरोधात बोलायचे नाही, असे ठरले. बाळासाहेबांनी शेवटपर्यंत हा शब्द पाळला, पवारांनी मात्र शब्द तर मोडलाच', असा आरोप करत शिवसेनेमध्ये चार वेळा फूट पाडली अशी टीकाही केसरकर यांनी यावेळी केली.'शरद पवार हे ज्येष्ठ नेते आहेत. परंतु त्यांनी आतापर्यंत काय भूमिका घेतल्या आणि त्यातली वस्तुस्थिती काय आहे हे जनतेच्या निदर्शनास आणून दिले पाहिजे. राज्याचे कितीही नुकसान झाले तरी चालेल, परंतु आपले कौटुंबिक राजकारण शाबूत राहिले पाहिजे, या त्यांच्या भूमिकेला आमचा विरोध आहे', असे त्यांनी यावेळी जाहीर केले. '...म्हणून राष्ट्रपती राजवट लागू झाली'
'भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रित बैठका होऊन मंत्री, पालकमंत्री ठरले होते. अंतिम मंजुरीसाठी हा प्रस्ताव पंतप्रधान मोदींकडे गेला होता. त्यावेळी नरेंद्र मोदी म्हणाले, राष्ट्रवादीला सत्तेमध्ये घ्यायला माझा विरोध नाही. परंतु महाराष्ट्रात कोणत्याही परिस्थितीत शिवसेना सत्तेमध्ये असलीच पाहिजे. तशी ठाम भूमिका घेतली नसती तर त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपचे सरकार महाराष्ट्रात आले असते. भाजपबरोबर वाटाघाटी करण्यासाठी शरद पवार यांनी पुरेसा वेळ असतानाही पाठिंब्याचे पत्र राज्यपालांकडे सादर केले नाही. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये राष्ट्रपती लागवट लागू झाली', असा आरोपही त्यांनी यावेळी केला.









# मतदान हे महत्त्वाचे नागरी कर्तव्य : राठोड

## लालुचा तांडा येथे प्रांतधिकारी, तहसीलदार यांच्या उपस्थितीत मतदार जागृती अभियान




**ढवळपुरी : प्रतिनिधी**

**आपला आवाज ऐकू यावा आणि आपल्याला जे हवे आहे ते अंमलात आणले जाईल याची खात्री करण्यासाठी आपण मतदान केले पाहिजे. मतदान हा आपला देश आपल्याला देत असलेल्या मूलभूत अधिकार असून महत्त्वाचे नागरी कर्तव्य आहे याकरता मतदान करावे असे आवाहन प्रांतधिकारी गणेश राठोड यांनी केले.**

ढवळपुरी(ता.पारनेर)येथील लालुचा तांडा येथे मागील निवडणुकीत सर्वात कमी मतदान झाले होते.मतदान कमी होण्याची कारणे शोधून शंभर टक्के मतदान होण्यासाठी महसुल विभागामार्फत मतदार जागृती अभियानाअंतर्गत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी तहसीलदार गायत्री सौंदाणे,सरपंच नंदा गावडे,उपसरपंच बबन पवार,नायब तहसीलदार गणेश आढारी,निवडणूक निर्णय अधिकारी केतकी कुलकर्णी,कक्षप्रमुख सिमा रहाणे,पी.एस.उचाळे,बी. टी. नरसाळे,दीपक गोरे उपस्थित होते.

राठोड यांनी बंजारा भाषेमध्ये ‘‘जय सेवालाल‘‘, ‘‘जय सामका माता‘‘ तसेच‘‘सारे लोके उनेणू प्रणाम‘‘ या बंजारा भाषेमध्ये आपल्या मार्गदर्शनाची सुरुवात करत मतदानाचे महत्त्व पटवून दिले.मतदान जनजागृती करिता तांड्यावरील प्राथमिक शाळेतील मुलांनी मतदान जनजागृतीसाठी प्रभात फेरी काढून मतदानाबाबत जनजागृती दिली

### मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य

**मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. प्रत्येक सुजान नागरीकला भारतीय संविधानाने मतदानाचा समान हक्क प्रदान केला आहे.प्रत्येक व्यक्तीने मतदान करून लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी आपला वाटा उचलायाला हवा.**

**गायत्री सौंदाणे**
**तहसीलदार,पारनेर**

### बंजारा भाषेत मतदानाचे महत्त्व

**प्रांतधिकारी राठोड यांनी बंजारा भाषेमध्ये मतदानाचे महत्त्व व अधिकार सर्व उपस्थितांना समजावून सांगितले तेव्हा सर्वांनी आम्ही सर्वजण मतदानाचा हक्क बजावणार असे एक सुरात सांगितले तसेच मतदान करण्याबाबत शपथ देखील घेण्यात आली.**

# अळकुटीच्या साईनाथ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

## ■ एनएमएमएस परीक्षेत ५९ विद्यार्थी उत्तीर्ण
## ■ २३ लाख ४२ हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्राप्त



**अळकुटी : प्रतिनिधी**

**येथील रयत शिक्षण संस्थेचे साईनाथ विद्यालयातील विद्यार्थ्यांनी एनएमएमएस व सारथी परीक्षेत उत्तुंग यश मिळविले आहे.या परीक्षेत ५९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून एकूण २३ लाख ४२ हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्राप्त झाली असल्याची माहीती प्राचार्य मंगेश जाधव यांनी दिली.**

विद्यालयात यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला त्यावेळी जाधव बोलत होते.यावेळी उपमुख्याध्यापक ए.टी.शेळके, पर्यवेक्षिका मंगल शिंदे उपस्थित होते. प्राचार्य जाधव म्हणाले,एनएमएमएस परीक्षेत तालुक्यात साईनाथ विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठे यश प्राप्त करत प्रथम क्रमांक मिळविला.यशस्वी विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख जाधव व्ही. पी,शिंदे एम.जे,आंबरे एस.एस,कातोरे जी.एस यांचे मार्गदर्शन लाभले.

### हे आहेत यशस्वी विद्यार्थी

**मोरेश डेरे, आयुष व्हटकर ,संस्कृती जाधव,आयुष व्हटकर,मुळे स्वयंम,डेरे आयुष,घोलप ओंकार,गिरी आयुष,वाघ गौरव,डेरे तनिष्का,शिरोळे सानवी, जगताप यश मुळे रिया, पानमंद कार्तिक,चिकणे श्रावणी, पानमंद ओम, भंडारी सौरव, मुळे समर्थ, म्हस्के सिद्धी,पावडे वैष्णवी,पडवळ ईश्वरी, पुंडे साई भंडारी रोशनी, बेलोटे आर्यन, थोरात करण डेरे ईश्वरी, कापसे समृद्धी ,डेरे आर्यन,वामन ऐश्वर्या,मुळे आरती,शेटे सानवी,गहाणडुले अनुष्का उजघरे, मुक्ता येवले यश खिलारी, श्रेया,गोर्डे, आर्या देशमुख, तनिष्का, गोर्डे सार्थक, हाडवळे आदित्य,शिरोळे ऋतुजा,खडके सिमरन, आवारी ओम, भंडारी तनुजा,दाते तनिष्का,भोसले ओम ,मोरे शुभम थोरात अनुष्का,तांबोळी कृष्णा,चौधरी समृद्धी पानमंद मयुरी, म्हस्के कल्याणी, पुंडे तनिष्का डेरे सार्थक,लामखडे श्रुष्टी, आवारी श्रावणी कड आर्यन, गोरडे ईश्वरी, चौधरी तनिष्का पुंडे अनुश, गावडे गौरव.**

# शेतकऱ्याची कन्या झाली फौजदार!

## पारनेर तालुक्यातील तिखोलच्या कविताची कहाणी

**तिखोल : प्रतिनिधी**

**आई वडील शेतकरी त्यांना शिक्षण घेता आले नाही, त्यांनी आपल्या मुलीला तिचे ध्येय गाठण्यासाठी कष्ट व मेहनत घेतली. तिची अर्थिक अडचण दूर करून तिच्या पाठीशी खंबीर उभे राहून तिला सतत प्रोत्साहन दिले. यामुळे आज ती फौजदार झाली.**



तिखोल (ता. पारनेर) येथील सखाराम ठाणगे, आई जिजाबाई ठाणगे यांनी त्यांची मुलगी कविता ठाणगे हिला फौजदार करण्याची खुणगाठ मनाशी बांधली. त्या दोघांना शिक्षणाची खूप आवड होती; परंतु आर्थिक अडचणींमुळे ती इच्छा अपूर्ण राहिली. त्यांचे ते स्वप्न मुलीच्या रुपाने पूर्ण करण्याचे ठरविले अन् कविताचा फौजदार होण्याचा प्रवास सुरू झाला. भलेही आमच्यापासून दूर रहा; मात्र शिक्षण पूर्ण कर, असे ठरविण्यात आले.

कविताचे प्राथमिक शिक्षण काकणेवाडीत झालेत्यापुढील तिखोल, इंजिनियरिंगचे शिक्षण कर्जत तालुक्यातील तासगावकर विद्यालयात, इंजिनियरिंगमध्ये प्रथम क्रमांक मिळवत शिक्षण पूर्ण केले. पुढे स्पर्धा परीक्षा देण्याचे ठरविले. २०२१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत दुसऱ्या प्रयत्नात कविताने यश प्राप्त करत पोलिस उपनिरीक्षक पदावर तिची निवड झाली आहे.

### गरीबी शिक्षणाच्या आड येत नाही

**पदापर्यंत पोहोचण्यासाठी सुरवातीच्या काळात आई-वडिलांनी कष्टातून दिलेले शिक्षण अन् पुढे पतींनी दिलेली साथ महत्त्वपूर्ण ठरली. कुठलीही शिकवणी न लावता घरी लहान बाळ असताना या यशापर्यंत पोहोचताना ठाणगे, तांबे परिवाराचे योगदान अमूल्य आहे. मुलांनी शिक्षण घेताना संयम ठेवावा आणि गरीबी शिक्षणाच्या आड कधीही येत नाही.**

**कविता ठाणगे**
**पोलिस उपनिरीक्षक**

# ग्रामीण भागातील महिलांची उन्हाळी कामांची लगबग

## शेवया, कुरड्या, पापड्या करण्याची धांदल

**सुपा : प्रतिनिधी**

**एप्रिल व मे महिन्याच कडक ऊन, नुकताच पडत असलेला अवकाळी पाऊस, घरातील मुलां मुलींना शाळेला लागलेल्या सुट्टया या सर्व वातावरणात दरवर्षी प्रमाणे महिलांची उन्हाळी कामांची लगबग पहावयास मिळत आहे.**

पारनेर शहर व वाड्या वस्तीवरील महिलाची उन्हाळी कामांची घरात वर्षभर लागणाऱ्या पापड ,शेवया, वडे ,वेफर्स , कुरडया निर्मितीसाठी ग्रामीण भागातील महिलांची लगबग वाढली दिसून येत आहे. शेतीची कामे उरकल्याने महिला उन्हाळी कामात व्यस्त दिसत आहेत.शहरात उन्हाळी कामासाठी यंत्र वापर जरी होत असला तरी महीला हाताने कुरडया, पापड्या बनवायला महत्त्व देत आहेत. एकमेका साहाय्य करू या भूमिकेतून शेजारी पाजारी राहणाऱ्या महिला त्यासाठी एकत्र येत असून सगळीकडे उन्हाळा संपण्यापूर्वी सर्व साहित्य तयार करण्याची धांदल वाढल्याचे ग्रामीण भागातील चित्र दिसत आहे.

ग्रामीण भागातील शेतीचे कामे उरकली असून बहुतांश गावाच्या यात्रा जत्रा होणार आहेत.उन्हाचा तडाका वाढू लागल्याने ग्रामीण भागात दरवर्षी उन्हाळा सुरू होताच शेतात पिकलेल्या ज्वारी ,गहू,



बाजरी, तांदूळ धान्यापासून महिलांची उन्हाळी वाळवण्याच्या पदार्थ बनवण्याची लगबग सुरू झाली असून घराघरात ज्वारी ,बाजरीच्या ,पापड्या, कुरडया शेवया ,खारवड्या, बटाट्याच्या चकल्या ,आधी उन्हाळी पदार्थ करण्यास सुरुवात झाली आहे गावातील चारचौघी महिलांनी एकत्र येऊन केल्या जाणाऱ्या या वाळवण्याच्या दिवसात चवीच्या रंगानुसार गृहिणींची सुखदु:खात पदार्थ बनविले जातात. घरातील लहान थोर यासाठी मदत करतात घरांच्या अंगणात, पडवीत ,वाड्यामध्ये, चौकात ,छतावर, कौलावर किंवा पत्रावर पदार्थ वाळवले जातात .तयार केलेले पदार्थ नातेवाईक तसेच शेजाऱ्यांना आवर्जून चवीसाठी दिले जातात.

ही परंपरा व संस्कृती अजूनही टिकून असल्याचे पाहवयास मिळते .पापड्या, कोरड्या ,शेवया ,सांडगे यासारखे पदार्थ बनवून उन्हात वाळवून वर्षभराची साठवणूक केली जाते. या काळात हवेत आद्रता नसल्याने तयार केलेली पदार्थ सादळत नाहीत ते वर्षभर टिकतात. त्यामुळे ग्रामीण भागातील महिला वर्गावर जुने पदार्थ उन्हाळ्यात बनवितात नोकरी आणि व्यवसाय निमित्त अनेकांनाही पदार्थ घरी बनवणे शक्य नसल्याने पापड , कुरडया,शेवया, आधी पदार्थांना शहरात मोठी मागणी असते.

महिला बचत गटाच्या मार्फत हे पदार्थ तयार करून शहरात मॉल,बाजार पेठेत विक्रीसाठी पाठवले जातात .बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना जास्त मागणी असते पापड ,शेवया, तयार करण्यासाठी अलीकडे लहान मोठी यंत्र उपलब्ध झाले आहेत शहरी भागात विशेष करून या अंतराचा प्राधान्य वापर असला होत असला तरी ग्रामीण भागात अद्याप यंत्रांना म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही.हाताने तयार केलेल्या घरगुती स्वादाच्या पापड, कुरडया,शेवयांची चव, यंत्राच्या साह्याने तयार झालेल्या साहित्याला येत नसल्याने गृहिणी स्वत:च्या हाताने तयार केलेल्या साहित्याला पसंती देतात त्यासाठी किती कष्ट करण्याची त्यांची तयारी असते.

# जगप्रसिद्ध रांजणखळगे कुंड अद्याप कोरडेच !

## पाणी न आल्याने भाविक व ग्रामस्थांमध्ये नाराजी

**निघोज : प्रतिनिधी**

**मळगंगा देवीचा मुख्य यात्रा उत्सव बुधवार दि.१ मे रोजी सुरू होत असून या यात्रेसाठी निघोज येथील कपिलेश्वर बंधारा व जगप्रसिद्ध रांजणखळगे कुंड परिसरात पिण्याच्या पाण्याची अत्यंत आवश्यकता आहे. मात्र यात्रा उत्सव तीन दिवसावर येऊन ठेपला असून अद्यापही पाणी न आल्याने भाविक व ग्रामस्थ यांच्यामध्ये तिव्र नाराजी निर्माण झाली आहे.**



मळगंगा देवी हे राज्यातील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे संपूर्ण राज्यातील लाखो भाविक या यात्रेसाठी येत असतात. दि.२२ रोजी देवीला हळद लावण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर दि.२३ रोजी देवीच्या काठीची मिरवणूक काढण्यात आली. ११ दिवसाच्या या यात्रा उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

निघोज परिसर हा भाग कुकडी डावा कालवा तसेच कुकडी नदीने समृद्ध आहे मात्र या ठिकाणी उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. यावर्षी कडक उन्हाळा आहे साधारण ३८ ते ४० असे उच्चांकी तापमान असल्याने पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. गेली पंधरा दिवसांपूर्वी निघोज ग्रामस्थांनी यात्रेसाठी पाणी न सोडल्यास लोकसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्कार घालण्याचा इशारा दिला होता त्यानंतर कुकडीचे कार्यकारी अभियंता व संबंधितांनी या इशाऱ्याची दखल घेत साधारण दि.१६ रोजी कुकडी नदीला पाणी सोडण्याचा निर्णय घेतला होता. डिंभा व येडगाव धरणातून ४५० क्युसेक्सने पाणी सोडले होते त्यानंतर पुन्हा १०० क्युसेक्स पाणी कमी केले व सध्या ३५० क्युसेक्सने पाणी भाकरेवाडी बंधाऱ्यात आले आहे. भाकरेवाडी बंधारा रविवारपर्यंत भरल्यानंतर हेच पाणी पांढरकरवाडी मार्गे कुंडात जाईल मात्र यासाठी मंगळवार पर्यंत वाट पाहावी लागणार आहे यासाठी लवकरात लवकर पाणी सोमवार पर्यंत कुंडात जाण्यासाठी कुकडी नारायणगाव येथील अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी भाविक व ग्रामस्थ करीत आहेत.

### कुंडात दुर्गंधीयुक्त पाणी

**पारनेर तालुक्यातील निघोज येथील जगप्रसिद्ध रांजणखळगे हे एक राज्याचे महत्वाचे पर्यटन स्थळ आहे. या ठिकाणी मळगंगा मातेचे मंदीर असून हे जागृत देवस्थान लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. जगप्रसिद्ध रांजणखळगे म्हणजेच रांजणाकृती आकाराचे कुंड अनेक ठिकाणी आहे या कुंडाला कुकडी नदीचा मोठा आधार असल्याने या कुंडात सदोदित पाणी असते मात्र सध्या कडक उन्हाळा व पाण्याची टंचाई यामुळे येथील पाणी दुर्गंधीयुक्त झाले आहे. कुंडात जलचर प्राणी मोठ्या संख्येने असल्याने विशेष करुन मासे मोठ्या प्रमाणात होते गेली एक महिन्यापूर्वी डावा कुकडी कालव्याचे आवर्तन सुरु असताना पाणी सोडण्याचे नियोजन झाले असते तर या हजारो माशांना जीवदान मिळाले असते मात्र महाशिवरात्री मुहुर्तावर होत असलेल्या निघोज येथील बैलगाडा शर्यत वेळेवर झाली असती तर पाणी सुटले असते. मात्र बैलगाडा शर्यत एक ते दोन एप्रिल दरम्यान घेण्यात आली व कुकडी डावा कालव्याचे पाणी या शर्यतीसाठी थांबवण्यात आले. कुकडी नदीला साधारण ३५० क्युसेक्स ने पाणी येडगाव डिंभा या धरणातून गेली १० दिवसांपूर्वी सोडण्यात आले आहे मात्र हे पाणी कुंडात येण्यासाठी आणखी चार दिवस लागणार आहेत. तो पर्यंत हजारो मासे मृत्यूमुखी पडले असून निघोज आणि परिसरातील सोशल मिडियावर ग्रामस्थांनी या माशांना श्रद्धांजली वाहून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.**

# गुजरातच्या कांदा निर्याती परवानगीवर युवा शेतकऱ्यांची टीका

## केंद्र सरकारविषयी संतप्त भावना

**निघोज : प्रतिनिधी**

**केंद्र सरकारने गुजरात येथील दोन हजार टन कांदा निर्यातीसाठी परवानगी दिल्याबद्दल कांदा उत्पादक युवा शेतकऱ्यांनी सोशल मीडिया माध्यमातून केंद्र सरकारवर जोरदार टीका टिप्पणी केली असून गुजरातच्या शेतकऱ्यांना सन्मानाची वागणूक देणाऱ्या केंद्र सरकारने महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना अपमानास्पद वागणूक देत असून हा दुजाभाव करणाऱ्या केंद्र सरकारचा या युवा शेतकऱ्यांनी तिव्र शब्दात निषेध केला आहे.**

गुजरातचा दोन हजार टन कांद्याला निर्यातीसाठी परवानगी ही बातमी काही वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्याने युवा शेतकऱ्यांनी सोशल मीडियावर जोरदार टिका टिपन्नी करीत केंद्र सरकारवर ताशेरे ओढले आहेत. गुजरातपेक्षा महाराष्ट्रातील शेतकरी कांद्याचे



सर्वाधिक उत्पादन घेत आहे शिवाय कांद्याची गुणप्रत नंबर एकच आहे. असे असताना केंद्र सरकार मात्र महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर अन्याय करीत आहे. गेली सहा महिन्यांपूर्वी केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी करून कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय केला आहे.

सध्या कांदा काढणी सुरू असून कांद्याला दहा ते पंधरा रुपये किलोला भाव आहे कांदा उत्पादक खर्चाचा विचार केला तर कांद्याला प्रती किलोला पंचवीस ते तीस रूपये किलो भाव मिळण्याची गरज आहे मात्र केंद्र सरकार सातत्याने शेतकऱ्यांवर अन्याय करीत आहे. आता तर केंद्र सरकारने कहरच केला असून गुजरातच्या कांद्याला निर्यातीची परवानगी देऊन आमचे महाराष्ट्राशी काही देणे घेणे नाही हे सिद्ध केले आहे. केंद्र सरकारने गुजरात येथील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देतानाच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर अन्याय करण्याची भुमिका घेऊन आम्ही फक्त गुजरातचेच हीत साधणार हीच भूमिका घेतली आहे. अशावेळी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी सावध होण्याची भूमिका घेऊन आगामी लोकसभा निवडणुकीत भाजप पक्षाला धडा शिकवण्याची गरज असल्याची संतप्त भावना व्यक्त केली आहे.

# दैठणे गुंजाळच्या खंडोबा मंदिरात चोरी; दानपेटी व पितळी मुर्तीची चोरी

**दैठणे गुंजाळ : प्रतिनिधी**

**येथील खंडोबा मंदिरात चोरीची घटना घडली आहे. दानपेटीतील रोख रक्कम व पितळी मुर्तीची चोरी झाली.ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.**

याबाबत माहीती अशी की,गावातील खंडोबा मंदिरात शुक्रवारी पहाटे दिड वाजता तोंडाला रुमाल बांधून दोन अज्ञात चोरट्यांनी मंदिराचा मुख्य दरवाजा तोडुन आत प्रवेश केला. मंदीरात असणारी दानपेटीचे कुलुप स्कृड्रायव्हर च्या सह्हायाने तोडुन त्यातील रक्कम बाहेर काढली ही रक्कम मंदिरातील असणाऱ्या रुमालात बांधली यानंतर देवाच्या मुर्तीजवळ असणाऱ्या वस्तुंकडे चोरट्यांचे लक्ष गेले मुख्य मुर्तीजवळ असलेल्या खंडोबाची पितळी धातुची असणारी मुर्ती व दानपेटीतील रक्कम चोरट्यांनी चोरुन पोबारा केला आहे.




पहाटे पाच वाजता ही घटना समजल्यानंतर सरपंच बंटी गुंजाळ,नामदेव गुंजाळ,सुनिल गुंजाळ यांनी पारनेर पोलीस ठाण्यात मंदिरातील चोरीबाबत माहीती दिली.पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी भेट देत पाहणी केली.ही संपूर्ण चोरीची घटना मंदीरामधील सी.सी. टी.व्ही मध्ये कैद झाली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com